क्र.पोमसं/३१/३९-१/पोलीस अंमलदार-घबांअ-७६१०/१०५/२०२२ मुंबई, दि.१७/०६/२०२२

**संदर्भ:-** म.शासन,गृह विभाग शासन निर्णय क्र.बियुडी ०४२२/प्र.क्र.७४/आस्था-१, दि.०७/०६/२०२२

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांच्या घरबांधणी अग्रिमाबाबत.

*****

## परिपत्रक

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी बँका/ वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत रक्कम वितरीत करण्यास शासनाने दि.१०/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने माहे मे २०१९ पर्यंत एकूण रु.८६८.५० कोटी इतके घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात आले आहे. तथापि, माहे मे २०१९ पासून सदर घरबांधणी अग्रिमाचे अर्ज प्रलंबित आहेत.

महाराष्ट्र शासन यांनी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना खंडीत करण्यात आली आहे. सदर योजनेतील उर्वरीत अर्ज व नव्याने प्राप्त होणाऱ्या अर्जासाठी पुर्वीप्रमाणेच म्हणजे (शासकीय नियमित घरबांधणी अग्रिम योजना(HBA)) "मुख्यलेखाशिर्ष ७६१०" (७६१०००८७ गौणशिर्ष २०१-घरबांधणी अग्रिम) अंतर्गत घरबांधणी अग्रिम उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ ते ४ मधील मुद्दयाबाबतची माहिती (EXCEL SEET) इंग्रजी फॉन्ट TIMES NEW ROMAN (पेनड्राईव्ह मध्ये सॉफ्ट कॉपी) मध्ये भरुन या कार्यालयास (कार्यासन क्र.३१) दि.३०/०६/२०२२ पर्यंत सादर करावी.

तसेच संबंधीत कार्यालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे अर्ज प्रलंबित आहेत, त्यांची माहिती संबंधीत घटक प्रमुखांनी या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. ज्या पोलीस अधिकारी /अंमलदार यांची माहिती या कार्यालयास प्राप्त होणार नाही, त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच पोलीस अधिकारी /अंमलदार यांनी सॉफ्टवेअर मध्ये अर्ज सादर केला आहे. परंतू **या कार्यालयास वेळेत माहिती प्राप्त न झाल्यामुळे संबंधीत पोलीस अधिकारी /अंमलदार यांना घरबांधणी अग्रीम मंजूर झाले नाही, तर त्यास संबंधीत घटक कार्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.**

(एस. जयकुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

संचालक, न्याय सहायक वैद्यकीय प्रयोगशाळा, नाशिक/ पुणे/ कोल्हापूर/ नांदेड/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई/ अंगुली मुद्रांक, मुंबई

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे

अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक / अमरावती/ ठाणे

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर

## परिशिष्ठ-१/ Appendix-I

**घरबांधणी अग्रिम अर्ज रद्द झालेले पोलीस अधिकारी/ अंमलदार**

**Details of the applicant whose application has been cancelled.**

| अ.क्र.<br>Sr.No. | नाव<br>Name | सेवार्थ ID<br>Sevarth ID | अर्ज भरल्याचा दिनांक<br>Date of Application |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ठ-२/ Appendix-II

**बदली झालेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे बाबत**

**Details of the transferred applicants.**

| अ.क्र.<br>Sr.No. | नाव<br>Name | सेवार्थ ID<br>Sevarth ID | अर्ज ज्या कार्यालयातून भरण्यात आला होता त्या कार्यालयाचे नाव<br>Name of the application office | बदली झालेल्या कार्यालयाचे नाव<br>Name of the office transferred |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## परिशिष्ठ-३/ Appendix-III

**सद्य:स्थितीत घरबांधणी अग्रीम अर्ज प्रलंबित असलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे बाबत**

**Information regaring the pending HBA applicant**

| अ.क्र.<br>Sr.No. | नाव<br>Name | सेवार्थ ID<br>Sevarth ID | अर्ज ऑनलाईन भरल्याचा दिनांक<br>Date of Application | कार्यालयाचे नाव<br>Office Name |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## परिशिष्ठ-४/ Appendix-IV

**सदर कामकाज करणाऱ्या अधिकारी/ लिपीक यांचे बाबत**

**Information regarding the officer/clerk dealing with HBA.**

| अ.क्र.<br>Sr.No. | नाव<br>Name | घटक कार्यालयाचे नाव<br>Office Name | D.D.O.No. | मोबाईल नंबर<br>Mobile No. |
|---|---|---|---|---|
| १ | संबंधीत कार्यसन अधिकारी/ Desk officer | | | |
| २ | आहरण व संविधरण अधिकारी / D.D.O. | | | |
| ३ | संबंधीत लिपीक/ Corresponding Clerk | | | |

**टिप:- वरील माहिती (EXCEL SEET) इंग्रजी फॉन्ट TIMES NEW ROMAN मध्ये भरुन पेनड्राईव्ह मध्ये सॉफ्ट कॉपीसह या कार्यालयास ( कार्यासन क्र.३१ ) सादर करावी.**